# 'बिकट वाट यशाची' उद्योजकांना मार्गदर्शक

## डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन

**म. टा. प्रतिनिधी ■ पुणे**
matapune@indiatimes.com

शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या हुकमीचंद चोरडिया यांचा प्रवास आणि प्रवीण मसालेची पन्नास वर्षांची वाटचाल सांगणारे 'बिकट वाट यशाची' हे पुस्तक तरुण पिढी आणि उभरत्या उद्योजकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

प्रवीण मसालेवाले यांच्या सुवर्णमहोत्सवाला प्रारंभ होत आहे. यानिमित्ताने मधुबाला चोरडिया यांनी शब्दांकित केलेल्या 'बिकट वाट यशाची' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. रामोजी उद्योग समूहाचे रामोजी राव, कमलाबाई चोरडिया, हुकमीचंद चोरडिया, प्रवीण मसालेवालेचे संचालक राजकुमार चोरडिया, लेखिका मधुबाला चोरडिया आदी यावेळी उपस्थित होते.


अत्यंत कष्टाने घरगुती मसाले, लोणची, पापड या क्षेत्रात स्वतःचा ब्रँड निर्माण करून त्याला नावलौकिक मिळवून देण्याचे काम हुकमीचंद यांनी केले असल्याचे गौरवोदगार काढताना डॉ. जाधव यांनी, 'बिकट वाट यशाची' ही संघर्षमय जीवनाची कथा असून, ती अनुभवांनी भरलेली आहे.

व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी उपसावे लागणारे कष्ट यामध्ये प्रतिबिंबत झाले असल्याचे सांगितले. हुकमीचंद यांच्या जीवनाकडे पाहताना मला माझ्या आयुष्यातील पूर्वीचे दिवस आठवतात, असे रामोजी राव यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद देशमुख यांनी केले. विशाल चोरडिया यांनी स्वागत, तर आनंद चोरडिया यांनी आभार मानले.

मटाटाईम्स — २७।११।११

# घरोघरी आरोग्यदायी आस्वाद पोहोचविण्याचे कार्य

## हुकुमीचंद चोरडिया यांच्या कार्याचा गौरव



**'बिकट वाट वहिवाट' या हुकुमीचंद चोरडिया यांच्या जीवनचरित्राचे प्रकाशन पुण्यात शुक्रवारी झाले. यावेळी डावीकडून कमलबाई व हुकुमीचंद चोरडिया, रामोजी राव, डॉ. नरेंद्र जाधव, मधुबाला व राजकुमार चोरडिया उपस्थित होते.**

**पुणे : प्रतिनिधी**

"प्रवीण उद्योगसमूहाचे संस्थापक हुकुमीचंद चोरडिया यांचे व्यक्तिमत्त्व सातत्याच्या संघर्षातून तावून सुलाखून बाहेर पडले आहे. या संघर्षातूनच त्यांनी आपले जीवन समृद्ध केले. प्रत्येकाचा जीवनसंघर्ष हा एकमेवाद्वितीय असतो, तसेच हुकुमीचंदजींचा संघर्षही असाच एकमेवाद्वितीय आहे. त्यामुळेच त्यांचे चरित्र सकस असून, सांस्कृतिक वैभवात भर टाकणारे आहे", असे गौरवोद्गार केंद्र सरकारच्या नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी काढले. घरोघरी लाखो स्वयंपाकघरात आरोग्यदायी आस्वाद पोचविण्याचे कार्य त्यांनी केले आहे, असा ही त्यांनी आवर्जुन उल्लेख केला.

'बिकट वाट यशाची' या जीवन चरित्राचे प्रकाशन आज शानदार समारंभात झाले. यावेळी या पुस्तकाचे प्रकाश रामोजी उद्योगसमूहाचे अध्यक्ष रामोजी राव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थान डॉ. नरेंद्र जाधव यांनी भूषविले.

हुकुमीचंद यांनी आपल्या यशाचे श्रेय पत्नीला दिले, याचा डॉ. जाधव यांनी आवर्जून उल्लेख केला. सुनेने सासऱ्याचे चरित्र लिहिणे ही दुर्मिळ गोष्ट आहे ती इथे घडली. अलीकडे दूरचित्रवाहिन्यांवरील मालिका पाहता सासवा - सुना नेहेमी भांडत असतात असाच समज झालेला आहे. हे विरोधाभासाचे उदाहरण म्हणूनच ठळकपणे लक्षात येते. हुकुमीचंदजींच्या जीवनचरित्राकडे पाहता मला माझ्या आयुष्यातील पूर्वीचे दिवस आठवतात , असे सांगून रामोजी राव यांनी त्यांच्या 'प्रिया' लोणची आणि इतर उत्पादनांच्या निर्मितीच्या प्रयत्नाचा संदर्भ दिला. ते म्हणाले, तीस वर्षांपूर्वी लोणची विकत घेण्याची मानसिकता नव्हती. हुकुमीचंदजींच्या काळात तर हा प्रकार कठीणच होता, परंतु त्यांची सचोटी, कामावरील निष्ठा यामुळे ते यशस्वी झाले. त्यांच्या पत्नी कमलाबाई यांनी घरगुती वापरासाठी केलेला लोणची मसाल्याचा मॅजिकल फॉर्म्युला यशस्वी झाला. यामुळे प्रवीण मसालेच्या यशात त्यांचा मोठा वाटा आहे. प्रारंभी विशाल चोरडीया यांनी उपस्थितांचे स्वागत केले. राजकुमार चोरडिया, कमलबाई चोरडिया, यांचीही भाषणे झाली. हुकुमीचंदजींच्या जीवनावरील एक माहितीपट यावेळी दाखविण्यात आला. आनंद चोरडिया यांनी आभार मानले. आनंद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी
26/11/11

# यशस्वी व्यक्तिमत्त्व हे संघर्षातून घडते-डॉ. जाधव

## ■ 'बिकट वाट वहिवाट' पुस्तकाचे प्रकाशन ■



बिकट वाट वहिवाट या पुस्तकाचे प्रकाशन रामोजी राव यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कमलाबाई व हुकुमचंद चोरडिया, डॉ. नरेंद्र जाधव, मधुबाला व राजकुमार चोरडिया.

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) - प्रत्येक यशस्वी व्यक्तिमत्त्व हे मोठ्या संघर्षातून घडत असते. प्रवीण उद्योग समूहाचे संस्थापक हुकुमचंद चोरडिया यांचे व्यक्तिमत्त्व ही अनेक संघर्षाचा सामना करत घडलेले आहे. त्यामुळेच बिकट वाट वहिवाट हे त्यांचे चरित्र सकस असून सांस्कृतिक वैभवात भर घालणारे आहे असे प्रतिपादन केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

प्रवीण मसाले समूहाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित झकास पचास या विशेष कार्यक्रमात बिकट वाट वहिवाट या पुस्तकाचे प्रकाशन रामोजी उद्योग समूहाचे अध्यक्ष रामोजी राव यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी डॉ. जाधव बोलत होते. पुस्तकाच्या लेखिका मधुबाला चोरडिया, राजकुमार चोरडिया आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, कितीही मोठे संकट आले तरी न डगमगता चोरडियांनी वाटचाल केलेली आहे. संघर्षमय जीवनाची ही कथा नव्या उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. पुस्तकाच्या दुसऱ्या आवृतीमध्ये प्रवीण मसाले हा उद्योग जागतीक पातळीवर पोचल्याची व त्यासाठी घेण्यात आलेल्या कष्टाची माहिती देण्यात आलेली आहे, याचा उल्लेख करून डॉ. जाधव म्हणाले, यशस्वी होण्यासाठी उपसाव्या लागणाऱ्या कष्टाची माहिती चोरडिया यांनी दिली आहे.

रामोजी राव म्हणाले, ''हुकुमचंदजी यांच्या यशामध्ये त्यांच्या पत्नी कमलाबाई यांचाही सिंहाचा वाटा आहे, त्यांनी घरगुती वापरासाठी केलेल्या लोणची, मसल्याचा मॅजिकल फॉर्मुला याशस्वी झाला यामुळे प्रवीण मसालेच्या यशामध्ये त्यांचा वाटा मोठा आहे.'' राजकुमार चोरडिया, कमलाबाई चोरडिया, यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. हुकुमचंदजींच्या जीवनावरील एक माहितीपट यावेळी दाखविण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद देशमुख यांनी केले, आनंद चोरडिया यांनी आभार मानले.

# हुकमीचंद चोरडिया यांचे जीवनचरित्र तरुणांसाठी मार्गदर्शक : डॉ. जाधव

पुणे, सं.प्र. :

शून्यातून विश्व उभारणाऱ्या हुकमीचंद चोरडिया या जिद्दी उद्योजकाचा प्रवास व प्रवीण मसालेच्या पन्नास वर्षांची वाटचाल सांगणारे 'बिकट वाट यशाची' हे पुस्तक तरुण पिढीसाठी, उभरत्या नवनवीन उद्योजकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी यावेळी व्यक्त केले.

प्रवीण मसालेवालेच्या सुवर्णमहोत्सवास प्रारंभ होत असून या महोत्सवाप्रसंगी मधुबाला चोरडिया यांनी शब्दांकित केलेल्या व प्रवीण उद्योग समूहाचे संस्थापक हुकमीचंद चोरडिया यांच्या जीवनचरित्रावर आधारित 'बिकट वाट यशाची' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या वेळी रामोजी समूहाचे अध्यक्ष रामोजी राव, पुस्तकाच्या लेखिका मधुबाला चोरडिया, राजकुमार चोरडिया आदी मान्यवर उपस्थित होते.



ते पुढे म्हणाले की, पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये प्रवीण मसाले हा उद्योग जागतिक पातळीवर पोचल्याची, त्यासाठी घेतलेल्या कष्टाची माहिती देण्यात आली आहे. संघर्षमय जीवनाची ही कथा असून, ते अनुभवांनी भरलेले आहे. व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी उपसाव्या लागणाऱ्या कष्टाची माहिती दिली आहे.


अत्यंत कष्टाने घरगुती मसाले, लोणची, पापड या क्षेत्रात स्वतःचा ब्रँड निर्माण करून त्याला नावलौकिक मिळवून देण्याचे काम हुकमीचंद चोरडिया यांनी केले. हुकमीचंद यांनी आपल्या यशाचे श्रेय पत्नीला दिले, याचा डॉ. जाधव यांनी आवर्जून उल्लेख केला.

हुकमीचंदजींच्या जीवनचरित्राकडे पाहता मला माझ्या आयुष्यातील पूर्वीचे दिवस आठवतात, असे सांगून रामोजी राव यांनी त्यांच्या प्रिया लोणची आणि इतर उत्पादनांच्या निर्मितीच्या प्रयत्नांचा संदर्भ दिला.

ते म्हणाले की, हुकमीचंद चोरडिया यांनी आपली पत्नी कमल चोरडिया यांच्या साह्याने सुमारे ५० वर्षांपूर्वी प्रवीण उद्योगसमूहाची मुहूर्तमेढ रोवली. हा उद्योग सुरू केला, तेव्हा घरोघरी मसाले व लोणची तयार केली जात होती. त्यामुळे विकतचे लोणची व मसाले घेण्यास ग्राहकाला तयार करणे अशक्य होते. केवळ गुणवत्ता, प्रामाणिकपणा व सचोटीमुळे हे शक्य झाले.

हुकमीचंदजींच्या जीवनावरील एक माहितीपट यावेळी दाखविण्यात आला. विशाल चोरडिया यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आनंद चोरडिया यांनी आभार मानले. आनंद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

सामना
२४/११/११



कोरेगाव पार्क : हुकमीचंद चोरडिया यांच्या जीवनावर आधारित 'बिकट वाट यशाची' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात गप्पा मारताना चोरडिया, रामोजी राव व डॉ. नरेंद्र जाधव.

# संकटाला सामोरे जाणारेच यशस्वी होतात : डॉ. जाधव

## 'बिकट वाट यशाची' पुस्तक प्रकाशन सोहळा

**पुणे, ता. २५ :** "प्रत्येक घरातील स्वयंपाकघरामध्ये मसाल्याची चव पोचविण्यामध्ये 'प्रवीण मसाले' उद्योग यशस्वी झाला आहे. या उद्योगाच्या पन्नास वर्षांची वाटचाल सांगणारे 'बिकट वाट यशाची' हे पुस्तक प्रत्येक नवीन उद्योजकासाठी व व्यावसायिकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. कितीही मोठे संकट आले तरी न डगमगता, अपयशाने खचून न जाता, सातत्याने प्रयत्न करणारेच यशस्वी होतात," असे नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

'प्रवीण मसाले' कंपनीने पन्नास वर्ष पूर्ण केली. या निमित्त आयोजित 'झकास पचास' कार्यक्रमात 'प्रवीण मसाले' कंपनीचे संस्थापक हुकमीचंदजी चोरडिया यांच्या जीवनावर आधारित चरित्र पुस्तकाचे प्रकाशन डॉ. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी रामोजी समूहाचे अध्यक्ष रामोजी राव, पुस्तकाच्या लेखिका मधुबाला चोरडिया, राजकुमार चोरडिया उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, "पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये प्रवीण मसाले हा उद्योग जागतिक पातळीवर पोचल्याची, त्यासाठी घेतलेल्या कष्टाची माहिती देण्यात आली आहे. संघर्षमय जीवनाची ही कथा असून, ते अनुभवांनी भरलेले आहे. व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी उपसाव्या लागणाऱ्या कष्टाची माहिती दली आहे."

रामोजी राव म्हणाले, "हुकमीचंदजींच्या व्यवसायाचे यश हे त्यांच्या पत्नी कमलाबाई यांनी तयार केलेल्या मसाल्याच्या फॉर्म्युल्यामध्ये आहे. हा उद्योग सुरू केला, तेव्हा घरोघरी मसाले व लोणची तयार केली जात होती. त्यामुळे विकतचे लोणची व मसाले घेण्यास ग्राहकाला तयार करणे अशक्य होते. केवळ गुणवत्ता, प्रामाणिकपणा व सचोटीमुळे हे शक्य झाले." लेखिका मधुबाला म्हणाल्या, "सासऱ्यांनी केलेल्या कष्टाची, त्यांनी मिळविलेल्या यशाची माहिती जगाला व्हावी, यासाठी या जीवनचरित्राचे लेखन केले आहे."

विशाल चोरडिया यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण व प्रदीप चोरडिया यांनी स्वागत केले. आनंद चोरडिया यांनी आभार मानले.

सकाळ
२६/११/११

# भारताचा विकासदर युरोपवर अवलंबून : नरेंद्र जाधव

## युरोपातील आर्थिक पेचप्रसंगावर राजकीय तोडगा आवश्यक

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. २८ : "भारताचा विकास दर किती काळ स्थिर राहणार हे युरोपमधील परिस्थितीवर अवलंबून आहे," असे मत केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

भारतीय संविधान दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात 'जागतिक आर्थिक पेच व भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावर डॉ. जाधव बोलत होते. विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. वासुदेव गाडे आणि डॉ. विकास खरे या वेळी उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, "युरोपला आर्थिक पेच प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी आर्थिक धोरणापेक्षा राजकीय तोडग्याची आवश्यकता आहे. तेथील परिस्थितीमुळे जागतिक पातळीवर आर्थिक पेच उद्‌भवला आहे. याच परिस्थितीचा फटका सर्व देशांना सहन करावा लागत आहे.

युरोपमधील आर्थिक पेचामुळे युरोची घसरण झाल्याने अमेरिकन डॉलरची वृद्धी झाली आहे. त्यातच डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण झाली आहे. विकास दर राखण्यासाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये जागतिक परिस्थितीवर उपाययोजना करण्याची आवश्यकता असून त्यादृष्टीने अभ्यास सुरू आहे."


आर्थिक पेचप्रसंग पुन्हा निर्माण होण्यामागे युरोपचे निर्यात धोरण जबाबदार आहे. युरोपियन युनियन समूहातील १६ देशांनी 'युरो' चलनाचा स्वीकार केला आहे. त्यांच्यातील मोठ्या देशांनी त्याच समूहातील छोट्या देशांना मोठ्या प्रमाणात निर्यात केली. या परिस्थितीमुळे त्यांच्यावर कर्जाचा डोंगर वाढत आहे, असेही डॉ. जाधव यांनी नमूद केले.

सकाळ
29/11/11

# 'युरोपातील स्थितीवर विकासदर अवलबून'

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) - भारताच्या अर्थव्यवस्थेचा झपाट्याने विकास होत आहे. मागील तीन वर्षांपासून ७ टक्क्यांहून अधिक विकासाचा दर आहे. हा दर किती काळ स्थिर राहणार, हे युरोपातील परिस्थितीवर अवलंबून आहे, असे मत केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

भारतीय संविधान दिनानिमित्त पुणे विद्यापीठाच्या वतीने 'जागतिक आर्थिक पेच आणि भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावरील डॉ. जाधव यांच्या व्याख्यानचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. वासुदेव गाडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. विकास खरे उपस्थित होते.



डॉ. जाधव म्हणाले, ''युरोपात सध्या मोठा आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाला आहे. त्यामुळे १९२९ ते ३२ प्रमाणे जागतिक महामंदी आली आहे. या प्रसंगातून युरोपला बाहेर पडण्यासाठी आर्थिक धोरणापेक्षा राजकीय तोडगा काढण्याची गरज आहे. युरोपातील परिस्थितीमुळे युरोची घसरण झाल्याने अमेरिकन डॉलरची वृद्धी झाली आहे. त्यामुळे डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण झाली आहे.

एकीकडे तेलाच्या किमती वाढत असताना दुसरीकडे डॉलरच्या किमतीमध्ये वाढ झाल्याचा फटका सर्वच देशांना सहन करावा लागत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवरही त्याचा विपरीत परिणाम होणार आहे.

भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार प्रामुख्याने अमेरिकेशी होतो. त्यामुळे तेथून आयातीसाठी आता पहिल्यापेक्षा जास्त पैसे खर्च होणार आहेत. विकासदर राखण्यासाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये जागतिक परिस्थितीचा अंदाज घेऊन उपाययोजना करण्याची आवश्यकता असून त्यादृष्टीने शासनाने अभ्यास सुरू केला आहे. या समूहातील १६ देशांनी युरो चलनाचा स्वीकार केला आहे.

त्यांच्यातील मोठ्या देशांनी त्याच समूहातील छोट्या देशांना मोठ्या प्रमाणात निर्यात करून बळीचे बकरे बनविले आहे. त्यामुळे त्यांच्यावर कर्जाचा डोंगर एवढा झाला आहे की, आता ते फेडण्यासाठी त्यांच्याकडे अजिबात पैसा नाही.''

### शिक्षणाला प्राधान्य द्यावे

येणाऱ्या काळात भारत व चीन जागतिक महासत्ता असतील, असा अंदाज जागतिक अर्थतज्ज्ञांनी काढला आहे. त्यावेळी जगाच्या एकूण उत्पन्नात भारताचा वाटा ३० टक्क्याहून अधिक असण्याची शक्यता त्यांनी वर्तविली आहे. भारत पुन्हा महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यामध्ये तरुणांची भूमिका उल्लेखनीय असणार आहे. यासाठी शिक्षणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

लोकमत 26/11/11.

# भारताला उच्च शिक्षण हब बनविणार

## बाराव्या पंचवार्षिक योजनेत संकल्प; डॉ. नरेंद्र जाधव यांची माहिती

तुषार खरात : सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ११ : केंद्रीय नियोजन आयोगामार्फत सध्या बाराव्या पंचवार्षिक योजनेचे काम सुरू असून त्याअनुषंगाने बनविण्यात आलेल्या 'ॲप्रोच पेपर'ला केंद्राची मान्यता मिळाली आहे. त्यानुसार आगामी पंचवार्षिक योजनेत शिक्षण क्षेत्राला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. भारताला उच्च शिक्षणाचे हब म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न असून त्या अनुषंगाने अनेक योजना बाराव्या पंचवार्षिक योजनेत राबविण्यात येणार असल्याचे केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

इंडस फाउंडेशनच्या वतीने आयोजित केलेल्या 'इंडो-ग्लोबल एज्युकेशन समीट'च्या उद्‌घाटन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी इंडस फाउंडेशनचे अध्यक्ष सी. डी.

### अशा तरतुदी

- बाराव्या पंचवार्षिक योजनेत १० कोटी, तर २०२० पर्यंत ५० कोटी तरुणांना कुशल शिक्षण देणार
- जागतिक दर्जाच्या विद्यापीठांची स्थापना होणार
- शिक्षण क्षेत्रातील प्रशासक घडविण्यासाठी विशेष महाविद्यालये स्थापन करणार
- नालंदा विद्यापीठ पुनर्जीवित करणार.
- परदेशातील अनिवासी भारतीय प्राध्यापकांना १ - २ वर्षांसाठी भारतात शिक्षण देण्यासाठी पाचारण करणार

अऱ्हा व अन्य उपस्थित होते. जाधव यांनी बाराव्या पंचवार्षिक योजनेमधील शिक्षण क्षेत्रासंबंधीच्या संभाव्य योजनांची माहिती या प्रसंगी दिली. ते म्हणाले, "बाराव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधा या तीन क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. विद्यापीठांमध्ये संशोधनवाढीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. जागतिक पातळीवरील विद्यापीठांची निर्मिती करण्यावर भर दिला आहे. अशी नावीन्यता (इनोव्हेशन) विद्यापीठे नव्याने स्थापन केली जातील. शिवाय सध्या अस्तित्वात असलेल्या काही विद्यापीठांचे रूपांतर नावीन्यता विद्यापीठांमध्ये करण्यात येईल."

"रोजगारक्षम विद्यार्थी घडविण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यावर पंचवार्षिक योजनेत भर असेल. त्यासाठी लवचिक अभ्यासक्रम बनविले जातील. विद्यार्थ्यांना विविध विद्याशाखांचे विषय घेण्याची संधी देण्यात येईल," असे ते म्हणाले.

"भारतात पाचव्या-सहाव्या शतकात नालंदा विद्यापीठ अस्तित्वात होते. या विद्यापीठाचे जे काही पुरावे मिळाले आहेत, त्यावरून तिथे जगभरातील १० हजारपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे आढळून आले आहे. या विद्यापीठाचे पुनरुज्जीवन करून तिथे अमर्त्य सेन यांच्यासारख्या विद्वान व्यक्तीची नियुक्ती करण्याचा केंद्र सरकार विचार करीत आहे. उच्च शिक्षणाशी संबंधित पाच विधेयके केंद्र सरकारने तयार केली असून ती मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. या विधेयकांना मंजुरी मिळाल्यानंतर अस्तित्वात येणाऱ्या संभाव्य कायद्यांमुळे उच्च शिक्षणात आमूलाग्र कायापालट होईल. हे बदल पुढील दोन वर्षांनंतर दिसू लागतील," असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

सकाळ
12/11/11.

# उच्च शिक्षणातील दरी कमी करण्यासाठी नव्या योजना

## ज्येष्ठांना पीएच.डी.ची संधी, आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रम आणि समर्थ भारत अभियान राष्ट्रीय पातळीवर राबविणार

**पुणे : प्रतिनिधी**

उच्च शिक्षण आणि समाजात निर्माण झालेली दरी कमी करण्याच्या हेतूने बाराव्या पंचवार्षिक योजनेत केंद्रीय नियोजन आयोगातर्फे विविध शैक्षणिक योजनांचा समावेश करण्यात आला आहे. त्याद्वारे आता राष्ट्रीय पातळीवर सर्वच विद्यापीठांमध्ये समर्थ भारत अभियान योजना, आपत्ती व्यवस्थापनविषयक अभ्यासक्रम आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विद्यापीठांमध्ये पीएच.डी. करण्यास मान्यता देण्यात येणार आहे.

नियोजन आयोगाचे सदस्य आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी ही माहिती दिली.

नियोजन आयोगाच्या उच्च शिक्षणविषयक सुकाणू समितीचे सदस्य आणि सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भूषण पटवर्धन व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. जाधव यांनी दूरध्वनीवरून पत्रकारांशी संवाद साधला.

डॉ. जाधव म्हणाले, उच्च शिक्षणात आवश्यक असलेल्या बदलांचा समावेश नियोजन आयोगाने बाराव्या पंचवार्षिक योजनेत करायचे ठरविले आहे. मी जेव्हा पुणे विद्यापीठाचा कुलगुरू होतो, त्यावेळी समर्थ भारत अभियान राबविले होते.

या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला होता, त्यामुळे आता हीच योजना सर्वच विद्यापीठांमध्ये राबविण्यात यावी. यासाठीचे आदेश नियोजन मंडळामार्फत विद्यापीठ अनुदान आयोगाला देण्यात येणार आहेत. तसेच नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्ती असे आपत्तीचे दोन प्रकार असतात. त्याविषयीचा अभ्यासक्रम राबविण्याची आज गरज आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, त्यांना पीएच.डी. करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय पातळीवर सर्वच विद्यापीठांमध्ये या तीन महत्त्वाच्या योजना राबविण्यात येणार आहेत, त्यामुळे उच्च शिक्षण आणि समाजातील दरी दूर होण्यास मदत होईल. समाजाची बौद्धिक उन्नती होईल.

नियोजन आयोगाच्या उच्च शिक्षणविषयक सुकाणू समितीची नुकतीच २४ ऑक्टोबरला दिल्ली येथे बैठक झाली. या बैठकीदरम्यान समितीचे सदस्य डॉ. भूषण पटवर्धन आणि डॉ. गजानन एकबोटे यांनी सुचविलेल्या मुद्द्यांवरही विचारविनिमय झाला. सुकाणू समितीचा उच्च शिक्षणविषयक मसुदा तयार झाला असून, लवकरच नियोजन आयोगाच्या सदस्यांसमोर तो मांडण्यात येणार आहे.

विशेषतः पंतप्रधानांनी याबद्दल विशेष रुची दाखविली असून, उच्च शिक्षणाचे फायदे सर्वदूरपर्यंत पोहोचावेत यासाठी विविध शैक्षणिकविषयक मुद्द्यांचा मसुद्यात समावेश करण्यात आला आहे.

डॉ. भूषण पटवर्धन आणि डॉ. गजानन एकबोटे यांनी या अहवालातील महत्त्वाच्या मुद्द्यांविषयी माहिती दिली. मसुद्यात विशेषतत्त्वाने नावीन्यतेवर भर देण्यात आला आहे, त्यामुळे आगामी काळात देशपातळीवर नावीन्यपूर्ण विद्यापीठांची निर्मिती करण्यात येणार आहे.

नावीन्यता हे मुख्य सूत्र ठेवून अभ्यासक्रम, संस्थांची रचना करण्याचे मसुद्यात सुचविण्यात आले. आहे. तसेच पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) चाही त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

मात्र, पीपीपीचा समावेश ना नफा या तत्त्वावर असणार आहे. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भरीव शैक्षणिक कर्जाची तरतूदही यात करण्यात आली आहे. तसेच राज्यस्तरीय विद्यापीठे व महाविद्यालयांचे सबलीकरण करण्याविषयीच्या तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. तसेच देशातील विद्यापीठांमध्ये जवळजवळ चाळीस टक्के शिक्षक फॅकल्टीच नाही, त्यामुळे विद्यापीठांनी फॅकल्टी मिशन सुरू करावे, त्याद्वारे चांगले शिक्षक विद्यापीठाला, महाविद्यालयांना मिळतील, अशा विविध सूचना करण्यात आल्या आहेत.

पुढारी ३/११/१

News Paper:- लोकमत

Date:- 26 नोव्हेंबर 2011



'बिकट वाट यशाची – एक अभिवादन' या चरित्रग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी (डावीकडून) कमलबाई व हुकुमीचंद चोरडिया, रामोजी राव, डॉ. नरेंद्र जाधव, मधुबाला आणि राजकुमार चोरडिया.

# चोरडिया यांच्या कथेत चित्रपटाची बीजे

## 'बिकट वाट यशाची'ला रामोजी राव यांचे अभिवादन

पुणे दि. २५ (प्रतिनिधी)

''हुकुमीचंद यांच्या चरित्रकथेत चित्रपटाची सारी बीजे आहेत. त्यांनी स्वतःचे नशीब स्वतः घडविले आहे,'' या शब्दात रामोजी उद्योग समूहाचे अध्यक्ष रामोजी राव यांनी 'प्रवीण उद्योगसमूहा'चे संस्थापक हुकुमीचंद चोरडिया यांचा गौरव केला.

चोरडिया यांच्या 'बिकट वाट यशाची' या मधुबाला चोरडिया यांनी शब्दांकित केलेल्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन आज रामोजी राव यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव अध्यक्षस्थानी होते. पुण्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रातील विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

रामोजी राव पुढे म्हणाले, ''हुकुमीचंदजी सुरुवातीच्या अपयशाने खचले नाहीत. उलट त्यांनी ते अपयश यशाच्या पहिल्या पायरीसारखे वापरले. त्यांनी केलेल्या कष्टामुळे आणि त्यांच्या व्यवसायाच्या दर्जामुळे आज त्यांना हे यश मिळाले आहे. त्यांची दूरदृष्टी मला विशेष वाटते. पत्नीची तितकीच मोलाची साथ त्यांना लाभली. त्यांनी तयार केलेल्या मसाल्यांमधूनच या व्यवसायाचा जन्म झाला, हे आपल्याला विसरता येणार नाही. मुलांनी आणि नातवांनी हा व्यवसाय समर्थपणे सांभाळला आहे. ते या व्यवसायाला आणखी पुढे नेतील अशी मला खात्री आहे.''

डॉ. जाधव म्हणाले, की एका हुकमी माणसाच्या चरित्र ग्रंथाच्या प्रकाशनाला उपस्थित असल्याचा मला आनंद होत आहे. सुनेने सासऱ्याचे चरित्र लिहिल्याची उदाहरणे फार दुर्मीळ आहेत. त्या दृष्टीने हा चरित्र ग्रंथ वेगळा ठरावा. मराठी साहित्यात चांगली भर घालण्याची ताकद या चरित्र ग्रंथात आहे. कौशल्य आणि व्यवसायाची सांगड कशी घालायची हे या पुस्तकात सांगितले आहे. नव्याने उद्योगात येणाऱ्यांना हे पुस्तक नक्कीच प्रेरणादायी ठरेल. पदवी हे साध्य नसून साधन आहे, हे त्यांना कळले होते. माणसे जोडण्याची आणि टिकवायची फार चांगली क्षमता हुकुमीचंद यांच्याकडे आहे. त्यांच्या सामाजिक बांधिलकीच्या गुणांचीही दखल घेण्याची गरज आहे. हुकुमीचंद चोरडिया म्हणाले, ''प्रेम ही जगातील सर्वांत सुंदर गोष्ट आहे. संपूर्ण 'प्रवीण परिवार' माझे कुटुंबच आहे. प्रवीण मसाल्याचा सुगंध नेहमीच दरवळत राहावा, हीच इच्छा आहे.''

राजकुमार चोरडिया यांनी प्रवीण मसालेची सुवर्णमहोत्सवी वाटचाल मांडत वडिलांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. हुकुमीचंद यांच्या पत्नी कमलबाई आणि स्नुषा मधुबाला चोरडिया यांनीही मनोगत व्यक्त केले. विशाल चोरडिया यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आनंद चोरडिया यांनी आभार मानले. आनंद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. चोरडिया कुटुंबातील चिमुकल्यांच्या नवाकार मंत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. अरुंधती पटवर्धन आणि सहकाऱ्यांनी गणेश वंदना सादर केली.


हुकुमीचंद चोरडिया यांच्यासोबत झालेल्या 'प्रवीण मसाले'चा प्रवास मांडताना राजकुमार चोरडिया यांनी ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि तत्कालीन उद्योगमंत्री कै. जवाहरलालजी दर्डा आणि लोकमत मीडिया लिमिटेडचे चेअरमन खासदार विजय दर्डा यांचा आवर्जून उल्लेख केला.

### लोणचे विकणे कठीणच होते : रामोजी राव

रामोजी राव यांनी आपल्या आयुष्यातील हृद्य आठवण याप्रसंगी सांगितल्या. ते म्हणाले, ''मी स्वतः तीस वर्षांपूर्वी लोणच्याचा व्यवसाय करत होतो. त्यामुळे या काळात लोणचे विकत घेणे किंवा ग्राहकाला ते विकणे किती कठीण होते, हे मलाही माहीत आहे. त्यामुळे आज प्रवीण मसाले हा व्यवसाय ज्या उंचीवर पोहोचला आहे, त्याचे विशेष वाटते.''

News Paper:-........सकाळ........

Date:-......२६ नोव्हेंबर २०११



**कोरेगाव पार्क :** हुकमीचंद चोरडिया यांच्या जीवनावर आधारित 'बिकट वाट यशाची' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात गप्पा मारताना चोरडिया, रामोजी राव व डॉ. नरेंद्र जाधव.

# संकटाला सामोरे जाणारेच यशस्वी होतात : डॉ. जाधव

## 'बिकट वाट यशाची' पुस्तक प्रकाशन सोहळा

**पुणे, ता. २५ :** "प्रत्येक घरातील स्वयंपाकघरामध्ये मसाल्याची चव पोचविण्यामध्ये 'प्रवीण मसाले' उद्योग यशस्वी झाला आहे. या उद्योगाच्या पन्नास वर्षांची वाटचाल सांगणारे 'बिकट वाट यशाची' हे पुस्तक प्रत्येक नवीन उद्योजकासाठी व व्यावसायिकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. कितीही मोठे संकट आले तरी न डगमगता, अपयशाने खचून न जाता, सातत्याने प्रयत्न करणारेच यशस्वी होतात," असे नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.

'प्रवीण मसाले' कंपनीने पन्नास वर्ष पूर्ण केली. या निमित्त आयोजित 'झकास पचास' कार्यक्रमात 'प्रवीण मसाले' कंपनीचे संस्थापक हुकमीचंदजी चोरडिया यांच्या जीवनावर आधारित चरित्र पुस्तकाचे प्रकाशन डॉ. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी रामोजी समूहाचे अध्यक्ष रामोजी राव, पुस्तकाच्या लेखिका मधुबाला चोरडिया, राजकुमार चोरडिया उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, "पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये प्रवीण मसाले हा उद्योग जागतिक पातळीवर पोचल्याची, त्यासाठी घेतलेल्या कष्टाची माहिती देण्यात आली आहे. संघर्षमय जीवनाची ही कथा असून, ते अनुभवांनी भरलेले आहे. व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी उपसाव्या लागणाऱ्या कष्टाची माहिती दली आहे."

रामोजी राव म्हणाले, "हुकमीचंदजींच्या व्यवसायाचे यश हे त्यांच्या पत्नी कमलाबाई यांनी तयार केलेल्या मसाल्याच्या फॉर्म्युल्यामध्ये आहे. हा उद्योग सुरू केला, तेव्हा घरोघरी मसाले व लोणची तयार केली जात होती. त्यामुळे विकतचे लोणची व मसाले घेण्यास ग्राहकाला तयार करणे अशक्य होते. केवळ गुणवत्ता, प्रामाणिकपणा व सचोटीमुळे हे शक्य झाले." लेखिका मधुबाला म्हणाल्या, "सासऱ्यांनी केलेल्या कष्टाची, त्यांनी मिळविलेल्या यशाची माहिती जगाला व्हावी, यासाठी या जीवनचरित्राचे लेखन केले आहे."

विशाल चोरडिया यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण व प्रदीप चोरडिया यांनी स्वागत केले. आनंद चोरडिया यांनी आभार मानले.